# पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

## ह क्षेत्रिय कार्यालय, कासारवाडी – ४११०३४

## मा. ह प्रभाग समिती सभा

## कार्यपत्रिका क्र. – ११

## सभावृत्तांत

दिनांक –०८/१०/२०२१ दुपारी-०२.०० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका मा.ह प्रभाग समितीची मासिक सभा शुक्रवार दिनांक ०८/१०/२०२१ रोजी दुपारी ०२.०० वा. ह क्षेत्रिय कार्यालयाच्या पं. दिनदयाळ उपाध्याय सभागृह येथे आयोजीत करण्यात आली. त्यास खालीलप्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| १) मा.हर्षल मच्छिंद्र ढोरे | - | सभापती |
| २) मा.शाम गणपतराव लांडे | - | सदस्य |
| ३) मा.सुजाता पालांडे | - | सदस्या |
| ४) मा. काटे स्वाती (माई) चंद्रकांत | - | सदस्या |
| ५) मा.राजापुरे माधवी राजेंद्र | - | सदस्या |
| ६) मा.चौगुले सीमा दत्तात्रय | - | सदस्या |
| ७) मा.संतोय बबन कांबळे | - | सदस्य |
| ८) मा.सोनवणे शारदा हिरेन | * | सदस्या |
| ९) मा.उषा उर्फ माई मनोहर ढोर | - | सदस्या |
| १०) मा.थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर | - | स्विकृत सदस्य |

याशिवाय सभेस, मा. थोरात विजयकुमार क्षेत्रीय अधिकारी, मा.श्रीम.शितल वाकडे- प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, श्री किशोर महाजन- कार्यकारी अभियंता झोनिपू स्था., श्री.जयकुमार गुजर – उपअभियंता – स्थापत्य,, डॉ.बिरादार सुप्रिया – वैद्यकिय अधिकारी – सांगवी रुग्णालय, श्री. विजयसिंह भोसले – उपअभियंता स्थापत्य, श्री.विजयसिंह भोजने – उपअभियंता बांधकाम परवानगी विभाग, श्री.राजेंद्र व्ही.डुंबरे – उपअभियंता बांधकाम परवानगी, श्री.मोरे चंद्रकांत आ.उपअभियंता पाणीपुरवठा, श्री. संजय काशिद- उपअभियंता बीआरटीएस, श्री.सगर पी.व्ही. उपअभियंता पाणीपुरवठा, श्री.चंद्रशेखर धानोरकर – उपअभियंता बीआरटीएस, श्री.वैभव पुसाळकर- उप अभियंता स्थापत्य उद्यान क्रीडा , श्री.भंडारी एस.पी.- क. अभियंता, श्री.कुंभार सी.एम.क.अभियंता स्था.उद्यान , श्री.महेंद्र के. देवरे - क.अभियंता, मोमीन ए.ए. – क.अ.स्थापत्य उद्यान क्रीडा, श्री.सचिन मगर- क.अ.स्थापत्य विभाग, श्री.सुनिल दांगडे – क.अभियंता स्थापत्य, श्री.सदाशिव बगली- क.अभियंता झोनिपू, श्री.लार्जे – क.अभियंता पाणीपुरवठा, श्री.चव्हाण दयानंद जगन्नाथ – स.उ.निरीक्षक, श्री.कडाळे मच्छिंद्र नामदेव- उ.सहाय्यक, श्री.महेश आढाव- मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.उध्दव ज्ञानेश्वर डवरी- आरोग्य निरीक्षक, श्री.एस.बी.मानमोडे – आरोग्य निरीक्षक, श्री.एस.एच.चव्हाण – आरोग्य निरीक्षक, श्रीम.वैशाली रणपिसे – प्र. आरोग्य निरीक्षक, श्री.नामदेव लांडगे – कार्यालय अधिक्षक, श्री.मधुकर सानप –उपलेखापाल, श्री.हुच्चे

सी.जी. – अतिक्रमण निरीक्षक, श्रीम.जयश्री साळवे – क्रीडा पर्यवेक्षक, श्री.कोटियांना डी.एस.- आ.नि.पशुवैद्यकिय, इत्यादी अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

----------

**प्रशासन अधिकारी तथा सचिव :** माहे ऑक्टोंबर २०२१ च्या दिनांक ०८/१०/२०२१ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळावी.

**मा. सभापती :** सभेचे कामकाज सुरु करण्यात मान्यता देणेत येत आहे.

तदनंतर माहे ऑक्टोंबर २०२१ च्या दिनांक ०८/१०/२०२१ रोजीचे मासिक सभेचे कामकाज सुरु करण्यास मान्यता मिळाली. माहे ऑक्टोंबर २०२१ च्या नियमित सभेचे कामकाज सुरु करण्यात आले .

**प्रशासन अधिकारी तथा सचिव :** मागील सभा कार्यपत्रिका क्र. १० माहे सप्टेंबरचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता मिळावी.

**मा. सभापती :** मागील सभा क्र. १० माहे सप्टेंबरचा सभावृत्तांत कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**प्रशासन अधिकारी तथा सचिव –** सन्मा.सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता मिळावी.

**मा. सभापती :** – **सन्मा.सदस्य यांनी सादर केलेले ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.**

----------

**विषय क्र.१)** प्रभग समितीच्या सभेमध्ये ऐनवेळचा विषय मंजूर करणेबाबत. मा.शाम लांडे यांचा दिनांक ०८/१०/२०२१ रोजीचे पत्र.

**विषय क्र.२)** प्रभाग क्र. ३२ मधील पुर्वेकडून पश्चिमेकडे जाणा-या ६० फुटी रोडला नाव देण्याबाबत मा.शारदा सोनवणे यांचे दि नांक ०८/१०/२०२१ चे पत्र.

-----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

----------

ठराव क्र. - ४८ — विषय क्र. – ०१

दिनांक : ०८/१०/२०२१ — विभाग : -

सूचक मा.शाम लांडे — अनुमोदक - मा.स्वाती (माई) काटे

**संदर्भ –** प्रभग समितीच्या सभेमध्ये ऐनवेळचा विषय मंजूर करणेबाबत. मा.शाम लांडे यांचे दिनांक ०८/१०/ २०२१ चे पत्र.

उपरोक्त विषयांकित प्रभाग क्र. २० कासारवाडी येथील संभाजी चौक येथेखूप वर्षापुर्वी वाचनालय व टॉयलेट ब्लॉक बांधण्यात आले होते सदर वाचनालय व टॉयलेट ब्लॉक हे ७.५० मी.रस्त्याच्या रोड वायडींगमध्ये असुन सद्यस्थिती मध्ये धोकादायक व मोडकळीस आले आहे. सदर ठिकाणी जीवीतहानी होण्याची संभवना असून सदरील वाचनालय व टॉयलेट ब्लॉक हे काढून टाकण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

ठराव क्र. - ४९ — विषय क्र. – ०२

दिनांक : ०८/१०/२०२१ — विभाग : -

सूचक - मा. उषा उर्फ माई ढोरे — अनुमोदक - मा. शारदा सोनवणे

**संदर्भ -** प्रभाग क्र. ३२ मधील पुर्वेकडून पश्चिमेकडे जाणा-या ६० फुटी रोडला नाव देण्याबाबत

CamScanner

मा.शारदा सोनवणे यांचे दिनांक ०८/१०/२०२१ चे पत्र.

प्रभाग क्र. ३२ मधील दत्तमठाकडुन शितोळे पेट्रोल पंप चौकापर्यंतच्या ६० फुटी रस्त्याला दत्तमठाजवळ J.S.M. रोड तसेच पश्चिमेकडून व पुर्वेकडे जाणा-या रस्त्याला जयसिंगराव माधवराव शितोळे नावाचा ठराव करुन बोर्डस बसविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

--------

**दिनांक : ०८/०/२०२१ रोजीच्या मासिक सभेमध्ये खालीलप्रमाणे चर्चा करण्यात आली.**

**मा.श्याम लांडे –** आरोग्य विभागाचे भोसले सर सेवानिवृत्त झाल्यानंतर त्यांचा चार्ज कोणाला दिला आहे. सध्या डेंग्यु, मलेरिया या आजाराचा प्रसार वाढला आहे त्यामुळे धूर फवारणी करण्यात यावी. विभाग प्रमुख नसेल तर शंका निर्माण होईल. आरोग्य विभागाचा कारभार वाईट चाललेला आहे. ठेकेदार यांच्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. आरोग्य विभागाची तक्रार याठिकाणी असल्यामुळे वचक कोणाचा राहणार आहे. वारंवार प्रभाग स्वच्छ झाला पाहिजे. सध्या किती तक्रारी आल्या आहेत हे सांगावे. यंत्रणा काहीही नाही. धुराची फवारणी झाली पाहिजे. साफसफाई झाली पाहिजे. आरोग्य विभागाची कामे होत नसल्यामुळे तक्रार कोणाला सांगायची

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** तुमचा जो मुद्दा आहे तो बरोबर आहे. याबाबत प्रशासनाकडे मागणी केलेली आहे. दोन-तीन वेळा पाठपुरावा झालेला आहे. सहायक आरोग्य अधिकारी यांच्या जागेवर सध्या पदभार दिलेला आहे. आढाव साहेब यांचेकडे पदभार आहे. पुढील नियुक्ती होईपर्यंत त्यांचेकडे कार्यभार सोपविण्यात आला आहे.

**मा.श्याम लांडे –** आढाव साहेब यांना तात्पुरता चार्ज दिला आहे त्यामुळे ते काहीच काम करू शकत नाही. कोरोनाचा प्रसार वाढला आहे. डेंगू मलेरिया यासारखे आजार उद्भवत आहेत. कोणाला याबाबत गांभीर्य नाही. हा प्रभाग सुरू झाल्यापासून याबाबत कोणीही काही करू शकत नाही. या प्रभागांमध्ये तरतूद देत नाही, गाड्या देत नाही,

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** ह क्षेत्रीय कार्यालयामध्ये त्वरीत सहायक आरोग्य अधिकारी यांची कायमस्वरूपी नेमणूक व्हावी यासाठी प्रयत्न चालू आहे.

**मा.सभापती -** श्याम लांडे यांचे म्हणणे अगदी बरोबर आहे. आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांना खूप काम असते. अतिरिक्त आयुक्त यांच्याशी त्वरित बोलून घ्यावे व त्या पद्धतीने अंमलबजावणी करावी. हा तुम्हालाच आदेश देत आहे. नवीन जे अधिकारी येतील त्यांना हा विषय समजून सांगायला पाहिजे. व त्याप्रमाणे कार्यवाही केली पाहिजे.

**मा.शाम लांडे –** ड्रेनेज विभागाचे अधिकारी अजून आले नाही. अधिकारी कोण आहेत हे ही माहिती नाही. आरोग्य विभागाचे अधिकारी अजून भेटले नाही. ओळख करून घेण्यासाठी अजून आलेले नाही. आज रोजी ह प्रभाग स्थापन झाल्यानंतर चार साडेचार वर्षात अधिकारी बदलतात. त्यांच्यावर कोणाचा कंट्रोल असतो. प्रभागावर महापालिकेचा अधिकार नाही. चार महिने झाल्यानंतर, (डिसेंबर नंतर) निवडणुकीला सामोरे जायचे आहे. त्यामुळे सभागृहात नेहमी सांगत

CamScanner

असतो भांडवली कामे का काढू शकत नाही. चुकीची कामे काढली जातात. स्थापत्य विभागाचे अधिकारी भांडवलाची कामे का काढत नाही. तुम्ही अध्यक्ष या नात्याने भांडवली कामे काढू शकत नाही याबाबत विचारणा केली पाहिजे.

**मा.सभापती -** मी स्वतः आयुक्त साहेबांशी बोललो आहे. सोमवारी आपण एकत्र सर्वजण जाऊ. ड्रेनेजचे कोण प्रमुख अधिकारी आहेत याबाबतही माहिती करून घेऊ.

**मा.शाम लांडे -** ड्रेनेज विभागाचे लोहकरे साहेबांनंतर कोण अधिकारी कधी आले नाहीत. ड्रेनेजचे खूप समस्या झालेल्या आहेत. परिस्थिती अवघड झालेली आहे, अजून ड्रेनेजबाबत परिस्थिती अवघड होईल. सगळेच कर्मचारी बदलल्यामुळे प्रभागाची परिस्थिती अवघड झालेली आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी-** ह प्रभाग कार्यालयामध्ये तेवढे उपलब्ध अधिकारी आहेत त्यांच्याकडून काम करून घेण्यात येईल. सध्या शितोळे साहेब आजारी आहेत त्यामुळे लोहकरे साहेबांना ॲडिशनल चार्ज दिलेला आहे.

**मा.सुजाता पालांडे** - लोहकरे साहेबांची बदली झाली आहे. दोन महिन्यापासून ते आता या प्रभागात काम करत नाही. परंतु त्यांना चार्ज देण्याची प्रोसेस कधी होणार आहे. ड्रेनेज, पाणी या बाबतीत सर्व लोकांना अडचणी निर्माण होत आहे याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा. मनुष्यबळ कमी आहे तर ती जबाबदारी प्रशासनाची आहे. माझ्या वॉर्डमध्ये कुत्र्यांचा खूप सुळसुळाट झालेला आहे. सहा जणांना कुत्रे चावले आहे. नसबंदी झालेली आहे तीच कुत्री इतरांना चावली आहे. मानसे कमी व कुत्री जास्त झालेले आहेत. वाय.सी.एम.रुग्णालयाच्या आवारात जवळपास १०० पेक्षा जास्त कुत्री आहेत. झोमेटोमध्ये काम करणारा मुलगा एकदा गांडीवर जात असताना त्याच्या मागे कुत्री लागल्यावर तो भीतीपोटी जीव मुठीत घेऊन गेला. अशा प्रकारे लोकांना कुत्र्यांची भीती मनात झालेली आहे. तरी याबाबत लवकरात लवकर निर्णय घेण्यात यावा.

**मा.माधवी राजापुरे-** माझ्या वार्ड मध्ये सुद्धा खूप कुत्रे झालेले आहेत त्यांचाही बंदोबस्त करण्यात यावा.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** दोन प्रभाग मिळून पशुवैद्यकिय वि भागाचे कामकाज होणार आहे. याबाबत लवकरच ऑर्डर तयार होईल. आत्ता सध्या एकच पशुवैद्यकीय विभाग आहे. त्यामुळे काम करताना अडचण निर्माण होत आहे. दोन प्रभाग मिळून कर्मचारी वाढल्यावर यंत्रणाही वाढेल व कामांमध्ये फरक पडेल.

**मा.श्याम लांडे -** कुत्रे कशामुळे वाढतात ते सांगितले पाहिजे. आमच्याकडे कर्मचारी वाढवून मिळत नाही. बजेट पण देत नाही त्यामुळे वॉर्डमधील कामे होत नाही.

**मा.सुजाता पालांडे** - नागरिकांसाठी कुठलीही गोष्ट नसेल तर आम्हालाही ती गोष्ट देऊ नका. आमच्यामुळे नागरिकांनी तडजोड करावी हे योग्य नाही. चर्चमधल्या बेसमेंटमध्ये परमिशन देत

बोर्ड पण जाहिरात म्हणून लावले जाते. संपुर्ण शहरात लावले जाते त्यांच्यावर कारवाई करावी. गरीब लोक आहेत त्यांच्या पोटावर मारू नका. त्यांच्यावर अन्याय करू नका.

**मा.सभापती** - भाजी मंडई शिफ्ट करण्यासाठी प्रशासन व अतिक्रमण विभागाकडून खूप मदत केली आहे. कारवाई केली त्याबाबत आम्ही प्रभाग क्रमांक ३२ चे सर्व नगरसेवक प्रशासन व अतिक्रमण विभागाचे मनापासून आभारी आहे.

**मा.शारदा सोनवणे** – स्वच्छता विषयक कामे कोण करत असते. माहेश्वरी चौक या ठिकाणी रस्त्यावर अतिशय घाण झालेली आहे. त्यामुळे त्या रस्त्यावरील स्वच्छता करण्यात यावी. रस्त्यावर खूप वाळू पडलेली आहे त्यामुळे रस्ता साफ करणे.

**मा.सभापती** – नर्मदेच्या बाजूला रस्त्यावर खड्डा झाला आहे. त्या ठिकाणी ब्लॉक बसविले आहेत त्यामुळे त्या ठिकाणी अपघाताचे प्रमाण वाढले आहे.

**मा.शारदा सोनवणे** - त्या रस्त्याचे काम पूर्ण झाले तर रस्ता स्वच्छ करावा. उद्यान विभागाची चव्हाण साहेब फोन उचलत नाही.

**मा.सभापती** - प्रभाग क्रमांक ३२ मधील सगळयाच नगरसेवकांनी चर्चा केलेली आहे. चारही नगरसेवक यांना असे त्यांना वाटत आहे की, त्यांची बदली करण्यात यावी. ?

**मा.शारदा सोनवणे** - आमच्या वॉर्डमधील झाडांचे फांद्यांची छाटणी करतात, परंतु झाडांच्या फांद्या उचलत नाही. मोठमोठे लाकडे रस्त्यात पडलेली असतात. त्यामुळे डास मच्छर फिरत असतात व त्याचा नागरिकांना त्रास होत असतो.

**मा.सीमा चौगुले-** आमच्या घरी कोण आले होते याबाबत चौकशी करावी. जे लोक मोठी बिल्डिंग बांधतात, कलरिंग करतात परंतु त्यांच्याकडे कोणी येत नाही. आमच्याकडे टेरेसचे बांधकाम करत असताना कोणते लोक अधिकारी येतात व तक्रारी करतात याबाबत चौकशी करण्यात यावी. ?
मा.सुजाता पालांडे- मंडळाचे मुलांनी दोन खांब उभे केले तर त्यांच्याकडून लगेच कारवाई केली जाते.

**मा.सीमा चौगुले-** माझ्या बोर्ड मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे कधी बसवणार आहेत?

**मा.दिलिप धुमाळ-** कार्य.अभियंता विद्युत विभाग- सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याचे काम टेलिफोन विभागाचे आहे. त्यांचे विभागाकडून काम करणार आहे.

**मा.संतोष कांबळे-**. शितोळे नगर मागे मागील बाजूस अतिक्रमण हटविण्याचे सहकार्य केले. त्यांचे याबाबत प्रभागांमध्ये निवेदनाच्या ठराव मानतो. याला माझे अनुमोदन आहे. कारवाई केल्यानंतर त्यांच्याकडे गाडी, टेम्पो व पोलीस नाही यंत्रणा नाही काही परिस्थिती निर्माण झाली तर काय करायचे

CamScanner

नाही. त्याठिकाणी लग्न करतात. नागरिकांसाठी कायदा शिथिल करावा लागेल. माझ्या वॉर्डमध्ये पहिल्या दिवशीच बॅनर काढला. आज का नाही बॅनर काढला. अतिक्रमण विभागाला सांगितले आहे का? एखाद्या माणसाला पद प्रतिष्ठा मिळते त्यामुळे त्याच्यासाठी नियम वेगळा, नागरिकांसाठी कायदा वेगळा आहे का?

**मा.क्षेत्रिय अधिकारी -** नागरिकांसाठी सुद्धा काळजी घेतली जाईल. त्यांचेसाठी सुद्धा नियम सारखाच असेल.

**मा.श्याम लांडे -** नाशिक फाटा पासून अतिक्रमण काढले नाही. कासारवाडी पासून अतिक्रमण आहे. आजपर्यंत अनेक वेळा सांगूनही ते अतिक्रमण हटवत नाही.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** अतिक्रमान बाबत एक दीड महिन्यापासून कारवाई मोठ्या प्रमाणात चालू आहे. फक्त प्रभागातून चालू आहे असे नाही, सगळीकडे अतिक्रमणांची कारवाई करण्यात येत आहे.
**मा.सुजाता पालांडे-** सगळीकडे बॅनर लावलेले आहेत. प्रभाग क्रमांक २० मधील बॅनर लावा.

**श्री.हुच्चे चंद्रकांत -अतिक्रमण निरीक्षक -** अतिक्रमण पथकाकडे पुरेशी यंत्रणा नाही.

**मा.श्याम लांडे-** नाशिक फाटा पासून कासारवाडी पर्यंत कोणाचीही तक्रार आली नाही का?

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** सगळयांच्या बाबत कारवाई करणार आहे. प्रभाग क्रमांक २० मध्ये अजून कारवाई सुरू केली नाही. प्रभाग क्रमांक २० मध्ये रस्त्यावर झुंबरवाले असतात त्यांना का काढले आहे. त्या रस्त्यावर अपघात झालेला आहे. पीसीएमसीच्या अधिकाऱ्यांनीच तो अपघात केलेला आहे. त्या व्यक्तीला१ ३ टाक पडले असून वाय सी एम हॉस्पिटल मध्ये ऍडमिट केले. व नंतर लगेच घरी सोडण्यात आले. याबाबत आपण काय कारवाई केली?

**मा.क्षेत्रीय अधिकारी –** या अपघातासंदर्भात पोलीस विभाग व अतिरिक्त आयुक्त यांच्या कडे तक्रार केलेली आहे.

**मा.श्याम लांडे -** पार्किंगचा विषय आहे. काही ठिकाणी रस्त्यावर दुकानदारांकडून हप्ते घेत असतात. सात ते आठ वाजेपर्यंत थांबून अतिक्रमण बाबत कारवाई केली पाहिजे.

**मा.सुजाता पालांडे -** पथारीवाले हटविले होते. नऊ दिवसानंतर आपण पैसे घेणार आहे. दहा वर्षे ते एका जागेवर आहे. व्यवसाय करणारे एका जागेवर बसून आपली उपजीविका करत आहेत. त्यांचे सणासुदीचे दिवस पैसे कमवायचे असतात. परंतु त्यांना उठवले आहे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** आपण सध्या उत्सवापुरते त्यांना व्यवसाय करण्याचे अधिकार दिलेले आहेत.
मा.सुजाता पालांडे- जर एखाद्या व्यवसायिकाकडून एक हजार रुपये घेत असेल तर त्यांना काय परवडणार आहे. लोकांचे सणासुदीचे दिवस आहेत, त्यांच्यावर अन्याय करू नका. दुकानदाराचे

**मा.क्षेत्रिय अधिकारी-** अतिक्रमणाबाबत कारवाई झाली तर यंत्रणा उपलब्ध करण्यात येईल. चारही प्रभागात टेम्पो, चार सुमो प्रत्येक विभागाला दिले जाईल. पाच-सहा मजूर दोन शिफ्टमध्ये काम करणार आहे. पुढच्या आठवड्यात प्रभागात टेम्पो, चार सुमो उपलब्ध येतील.

**मा.सभापती** स्थानिक नगरसेवक आहेत त्यांना विश्वासात घेऊन कामे करावीत.

**मा.क्षेत्रीय अधिकारी-** प्रत्येक ठिकाणी आपल्याला काम करावयाचे आहे. चौकात फूटपाथवर अतिक्रमण असतील तर त्याबाबत निर्णय घ्यायचा आहे. ते काम वेगळे आहे. रहदारीला अडथळा होणार नाही हे पाहिले जाईल. आपली भूमिका ही सर्वांसाठी आहे. भूमी जिंदगी विभागाकडून कारवाई अपेक्षित आहे. त्यांना जागा नसल्यामुळे नंतर ते करत आहेत.

**मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर-स्विकृत सदस्य -** प्रत्येक विभागात अतिक्रमण विभाग चालू झालेले आहे. पुढच्या महिन्यात बदल झालेला दिसेल. नाशिक फाटा, वायसी.ए.एम.एच,मेट्रो, डी.वाय.पाटील रस्ता असुन त्या ठिकाणी कारवाई करावी.

**मा.सभापती –** वॉर्डमधील चार जण एकत्र येऊन सांगितल्यावर अशी कारवाई झाली पाहिजे.

**मा. थोरात ज्ञानेश्वर मुरलीधर-स्विकृत सदस्य -**आम्ही सारखा फोन करत असतो प्रभाग क्रमांक २० मध्ये सगळे एकत्र काम करतात. आता शेजारच्या प्रभागात अभिनंदन होत आहे. आमचे विषय काय आहे, प्रश्न काय आहेत ते पाहिले पाहिजे. इतर प्रभागांमध्ये काय काय प्रश्न आहे ते बघितले पाहिजे.

**मा. सभापती –** इतर वॉर्डमध्ये विषय काय आहे, इतर प्रभागांमध्ये काय काय प्रश्न आहे ते बघितले जाईल.

**मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत-** काटे चाळीत महापालिकेने टॉयलेट बांधले आहे ते टॉयलेट धोकादायक झाले आहे त्यामुळे हे टॉयलेट पाडण्याबाबत निर्णय घेण्यात यावा.

**श्री.सुनिल दांगडे – क.अभियंता स्थापत्य-** प्रभाग समितीमध्ये ठराव करून टॉयलेट काढून टाकण्यात येईल

**मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत –** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुतळयाच्या बाजूला रस्त्यावर खूप घाण पडलेली आहे. ११ नंबर बस स्टॉपच्या बाजूला येत आहे. मुस्लिम दफनभूमी बाबत काही तरतूद करून घ्यावी. हा विषय नवीन आहे. त्या ठिकाणी लोक राहत आहेत परंतु त्यांना कनेक्शन दिले नाही. दोन कनेक्शन राहिले आहे. दोन कनेक्शन जोडायचे आहे तर त्याठिकाणी ते जोडून देऊन काँक्रिटीकरणचे काम करण्यात यावे. अर्जंट काम केले पाहिजे.

**श्री.चंद्रकांत मोरे- उपअभियंता पाणीपुरवठा –** तेथील नागरीक पाण्याची तक्रार करीत आहे. तेथे पाण्याची पाईप लाईन टाकली आहे. पाणी खराब येते. ज्यांनी पैसे भरले आहेत त्यांचे कनेक्शनचे काम केले आहे. १२ कनेक्शन पूर्ण झाले आहेत.

CamScanner

**श्री.चंद्रकांत मोरे- उपअभियंता पाणीपुरवठा -** दोन दिवसात कनेक्शन चे काम करून देण्यात येईल.
**मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत -** एक महिना झाला आहे अजून नळकनेक्शन दिले नाही. नळकनेक्शन जोडून झाले पाहिजे.

**मा.क्षेत्रीय अधिकारी -** लवकरात लवकर नळकनेक्शन देण्याबाबतचे काम करून दयावे.

**मा.काटे स्वाती (माई) चंद्रकांत-** माझ्या वॉर्डमध्ये भिंतीतून झाडांच्या मुळया वाढलेल्या आहेत त्याबाबत काहीही कोणी काम करत नाही. वॉर्डमधील काम झाले पाहिजे. सध्या डेंग्यूची साथ असल्यामुळे डास वाढले आहे.

**मा.संतोष कांबळे –** ह प्रभाग सुरु होऊन साडेचार वर्ष झाले आहेत. फक्त कुत्री पकडायची चर्चा होत आहे. काहीही काम होत नाही. शिवाय आपण तीन-चार वेळा मिटिंग घेतली होती. सांगवीमधील मधुबन सोसायटीच्या बाजूची भिंत बांधण्याबाबत अनेकवेळा चर्चा केली होती. भिंतीच्या बाजूला स्वच्छता केली पाहिजे इतक्या वर्षात स्वच्छता झाली नाही. अनधिकृत आहेत ती अतिक्रमण विभागाने काढले नाही. तेथील स्थानिक लोक कचरा करतात त्यामुळे ती भिंत पाडण्यात यावी. कारवाई होत नसेल तर काय करायचे. याबाबत कारवाई काहीच होत नसल्याचे वारवार सांगितले आहे.

**श्री.राजेंद्र व्ही.डुंबरे – उपअभियंता बांधकाम परवानगी -.** खाजगी जागेत भिंत बांधली आहे. ती संरक्षक भिंत आहे. याबाबत मालकांना नोटीस दिली आहे दुरुस्तीचे नोटीस देऊ शकतो.तो विषय नगररचना विभागाशी संबंधित असल्यामुळे त्यांच्याशी संपर्क करण्यात येईल. बारा मीटर रस्त्यावर अतिक्रमण असेल तर करू शकतो. नगररचना विभागाने डिमार्केशन करण्यात यावे

**मा.सभापती –** माहे ऑक्टोंबर २०२१ ची दिनांक ०८/१०/२०२१ रोजी झालेल्या सभेस सर्व सन्मा.सदस्यांचे व सर्व विभागाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित राहिल्याबद्दल त्यांचे आभार मानून मासिक सभेचे कामकाज संपलेचे जाहीर करण्यात आले.

हर्षल मच्छिंद्र ढोरे
सभापती, ह प्रभाग समिती,
ह क्षेत्रीय कार्यालय
कासारवाडी – पुणे -३४

प्रशासन अधिकारी तथा
सचिव (सभाशाखा)
ह क्षेत्रीय कार्यालय
कासारवाडी –पुणे -३४

CamScanner